## तामिळनाडूत हिंदी गाणी, चित्रपटांवर बंदी

**चेन्नई ।** तमिळनाडूच्या राजकारणात पुन्हा एकदा भाषावाद पेटण्याची चिन्हे आहेत. राज्यात हिंदी भाषेच्या वापरावर बंदी घालणारे विधेयक विधानसभेत सादर केले आहे. या विधेयकात हिंदी गाणी, चित्रपट, जाहिराती आणि होर्डिंग्जवर निर्बंध लावण्याचा प्रस्ताव आहे. सरकारचा दावा आहे की, हा कायदा संविधानाच्या मर्यादेत राहून तमिळ भाषा आणि संस्कृतीचे संरक्षण करेल. या प्रस्तावित कायद्याचा उद्देश तमिळनाडूमध्ये हिंदी भाषेच्या प्रचारावर आळा घालणे आहे.


# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

आज भविष्यवेध








इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २८ । अंक २८९ । गुरुवार, दि.१६ ऑक्टोबर २०२५ । पाने-८+८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर


## संपादकीय

### आक्षेप कायद्याच्या गैरवापराला

का ही बाबतीत समाजात दोन टोके आढळतात. महिलांसाठीचे कायदे हे त्यापैकी एक उदाहरण म्हंटले जाऊ शकेल. महिलांना दुय्यमत्व आणि अन्याय सहन करावा लागतो. त्याच्या परिमार्जनासाठी कायदे आवश्यकच आहेत, असे महिला चळवळी मानतात तर अनेक महिला कायद्यांचा गैरवापर करतात, अशी तक्रार पुरुष संघटना करतात. जशा महिलांवर अन्याय झाल्याच्या असंख्य घटना सांगितल्या जाऊ शकतात, तद्वतच अन्याय झाल्याची तक्रार पुरुषांनी केल्याच्या घटनांमध्ये वाढ आढळते. नुकतीच नागपूरमध्ये एका युवकाने आत्महत्या केली. त्याने चिठ्ठी लिहून ठेवली होती. कायदे महिलांच्या बाजूने असल्याची धमकी प्रेयसी द्यायची आणि विवाह करण्यासाठी दबाव आणायची, असे त्याने चिठ्ठीत लिहून ठेवले. त्याने थेट पंतप्रधानांना टॅग केले आहे. या घटनेचे सविस्तर वर्णन माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. महिलांसंदर्भातील कायद्यांच्या गैरवापराकडे अंगुलीनिर्देश करणार्या अशा घटना अधूनमधून घडतात. न्यायसंस्था देखील तसे निरीक्षण नोंदवतात. ४९८-अ या कलमाचा काही महिला प्रसंगी शस्त्रासारखा वापर करतात, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. गेल्या वर्षी घडलेल्या बंगळुरू घटनेने पान २ वर »

## बसस्थानकात डंपर घुसले : पाच जणांना चिरडले; दोघांचा मृत्यू; तिघे गंभीर



**शिंदखेडा ।** दीपोत्सवाला सुरुवात होत असताना डंपर काळ बनून आला. सुसाट डंपर बसस्थानकात घुसला. या डंपरने पाच जणांना चिरडले. त्यात महिलेसह दोघे जागीच ठार झाले. एक जण मृत्यूशी झुंझ देत आहे. त्याला नाशिकला हलविण्यात आल्याचे समजते. तर इतर दोघांवर धुळे जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत. आज सकाळी शिंदखेडा तालुक्यातील खलाणे गावात ही दुर्घटना घडली. या अपघातानंतर संतप्त ग्रामस्थांनी अपघाताला जबाबदार असणाऱ्यांवर कारवाईची मागणी करत मृतदेह ताब्यात न घेण्याची भूमिका घेतली. पोलिसांनी याप्रकरणी डम्परचालकाला ताब्यात घेतले आहे.

शिंदखेडा तालुक्यातील खलाणे गावच्या बस स्टॉपवर नेहमीप्रमाणे आज वर्दळ होती. सकाळी ९ वाजेच्या सुमारास काही प्रवासी बसची वाट पाहत उभे होते. अचानकपणे भरधाव जाणारा डंपर क्र. एमएच-०८-एपी-१२८२ थेट बसस्थानकामध्ये घुसला. काही कळण्याच्या आत डम्परखाली पाच जण चिरडले गेले. या अपघातात आशा भील आणि मका पावरा हे दोघे जागीच गतप्राण झाले. तर इतर दोघे गंभिर जखमी झाले. जखमींपैकी एका जणांची प्रकृती चिंताजनक आहे. त्याला नाशिक येथे अधिक उपचारासाठी हलविण्यात आले आहे. डम्परने बसस्थानकामध्ये घुसखोरी केल्याने बसस्थानकाचादेखील चेंदामेंदा झाला आहे. घटनेनंतर ग्रामस्थांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. या मार्गावरुन नेहमीच अवैध गौण खनिज वाहतूक होते. त्याचा त्रास ग्रामस्थांना होतो. अवैध गौण खनिज वाहतुकीमुळेच आज दोन जणांना जीव गमवावा लागला. जोपर्यंत संबंधितांवर कारवाई होत नाही. तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली. शिंदखेडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर वारे हे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी ग्रामस्थांशी चर्चा करुन त्यांचा संताप शांत केला.

‘¶V





# आम्हाला शंका, निवडणूक लांबवा!

## मतदार यादीतील घोळावरुन विरोधक आक्रमक

**मुंबई ।** एकाच मतदाराचे अनेक ठिकाणी नावे, मतदाराचे नाव आहे तर फोटो नाही. एकाच घरात २०० हून अधिक मतदार, मराठी मतदाराचे मल्ल्याळीत नाव, मतदारांची यादीतून गायब झालेली नावे, वडील आणि मुलगी यांच्या वयातील तफावत, अनेक मतदारांचे अविश्वसनीय वय आदी मुद्दे विरोधी पक्ष महाविकास आघाडी आणि मनसेने बुधवारी निवडणूक अधिकाऱ्यांच्या निर्दशनास आणून दिले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तोंडावर मतदार याद्यांमधील चुका सप्रमाण सिद्ध करत विरोधकांनी निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यामुळे मतदार यादीतील दोष आधी दुरुस्त करा आणि त्यानंतरच निवडणुका घ्या. अन्यथा इलेक्शनपेक्षा सिलेक्शन करुन मोकळे व्हा, असा संताप विरोधी पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला.



### आयोगाला हुकुमशाही गाजवू देणार नाही -उद्धव ठाकरे

लोकशाहीसाठी आणि त्याच्या रक्षणासाठी सर्व पक्ष एकत्र आले आहेत. पण आयोगाशी बोलताना लक्षात आले की, ते निवडणूक अधिकारी नव्हेत तर कटपुतली बाहुल्या आहेत. त्यांना वरून कोणातरी आदेश देते आणि हे काम करतात. त्यामुळे आम्हाला आमच्या मुद्यांवर योग्य उत्तर मिळाली नाहीत, असे सांगत शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी लोकशाहीच्या नावाने आयोग हुकुमशाही गाजवत असेल तर गाजवू देणार नाही, असे बजावले.

### तर लोकशाहीला मोठा धोका - बाळासाहेब थोरात

निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विधानसभा निवडणूकीच्या वेळी मतदार यादीत झालेले घोळ याची तक्रार आम्ही करून देखील त्यावर कारवाई झाली नाही. आता तीच यादी घेऊन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या तर त्या पारदर्शक असणार नाहीत. देशपातळीवर राहुल गांधी यांनी हाच मुद्दा मांडला आहे, अशी टीकाही थोरात यांनी केली.

### मतदार याद्या गोपनीय कशा? -राज ठाकरे

केंद्रीय आणि राज्य निवडणूक आयोगाच्या दोन्ही प्रतिनिधींची सलग दोन दिवस भेट घेतल्यानंतरही चर्चेतून काहीही निष्पन्न झाले नाही, असे सांगत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मतदारांची नावे वाचून दाखवत मतदार यादीमध्ये वडिलांपेक्षा मुलाचे वय जास्त दाखवण्यात आल्याकडे प्रसार माध्यमाच्या प्रतिनिधींचे लक्ष वेधले. त्यामुळे वडील कोण हा प्रश्न पडतो. यासाठी मतदार याद्यांमधील हा घोळ आधी दुरुस्त करा आणि त्यानंतर निवडणुका घ्या, अशी मागणी त्यांनी केली.

## महापालिकांसाठी मतदार याद्यांचा कार्यक्रम घोषित

**मुंबई ।** विरोधी पक्ष महाविकास आघाडीने सदोष मतदार याद्यांबद्दल प्रश्न उपस्थित केले असताना राज्य निवडणूक आयोगाने मंगळवारी रात्री उशीरा मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार महापालिका निवडणुकीसाठी पुढील महिन्यात २८ नोव्हेंबरला प्रभागनिहाय अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका पुढील वर्षी जानेवारी महिन्यात अपेक्षित आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमानुसार राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरून महानगरपालिका निवडणुकीसाठी तयार केलेली प्रारुप मतदार यादी महापालिका प्रशासनाने ६ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध करावी.

या प्रारुप यादीवर ६ ते १४ नोव्हेंबर २०२५ या दरम्यान हरकती आणि सूचना मागवल्या जाणार आहेत. तर २८ नोव्हेंबर रोजी हरकतीवर निर्णय घेऊन प्रभागनिहाय मतदार याद्या प्रसिद्ध करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. त्याचबरोबर ४ डिसेंबर रोजी मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करून १० डिसेंबर रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करावी, करावे असे राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी जारी केलेल्या आदेशात म्हटले आहे.

### केळी भाव

| | |
|---|---|
| नवती (१) | : 1175 |
| नवती (२) | : 975 |

### मिश्किली

तत्त्वाच्या नाही तर, आमचा फायद्याच्या राजकारणावर विश्वास आहे!!








